MHWS080007482019

**<u>रे. मु. नं. ६४/२०१९ मधील नि.क्र. ५५ वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र. ०१–अ (१) व ०१–अ (२) यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला विना जबाब चौकशीचा आदेश रदद होउन त्यांचा लेखी जवाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन लेखी जबाब दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**०२.** अर्जातील प्रतिवादी क्र. ०१–अ (१) व ०१–अ (२) यांचे कथनानुसार, सदर प्रतिवादी यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करणेस विलंब झाल्यामुळे आज रोजी सदर अर्जासोबत लेखी जबाब दाखल करीत आहे. प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक असल्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जावर वादीचे लेखी म्हणणे मागविण्यात आले असता वादीने अर्जास सक्त विरोध दर्शवला.

**०४.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा वाटप व स्वतंत्र कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. ०१–अ (१) व ०१–अ (२) यांच्यावर दावा समन्सची बजावणी दिनांक ०५.०८.२०२४ रोजी होउनही लेखी जबाब दाखल न केल्यामुळे दावा विना जबाब चौकशीवर ठेवण्यात आला. सदरचा अर्ज सुमारे एक महिन्यापेक्षा जास्त विलंबाने दाखल केलेला दिसून येते. अर्जात विलंबाबाबत नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु प्रतिवादी क्र. ०१–अ (१) व ०१–अ (२) यांचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांना स्वत:चा बचाव मांडण्याची संधी नाकारल्यासारखे होईल. याउलट अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचा बचाव न्यायालयासमोर येउन दावा गुणदोषांवर चालवण्यास व निकाली करणेस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीला लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत ठराविक दंड आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

## —: <u>आदेश</u> :—

१ प्रतिवादी क्र. क्र. ०१—अ (१) व ०१—अ (२) यांचा प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १६ मंजूर करण्यात येतो.

२ प्रतिवादी क्र. ०१—अ (१) व ०१—अ (२) यांना कैफियत/लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब त्यांनी प्रत्येकी रक्कम रू. १५०/— चा दंड वादींना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. प्रतिवादी यांनी दिलेली कैफियत/लेखी जबाब, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.01.04 17:34:25 +0530

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — ०४.०१.२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | हर्षाली अ. उचाडे |
| निकाल तारीख | : | ०४.०१.२०२५ |
| पिठासीन अधिका–याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०४.०१.२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०४.०१.२०२५ |